शब्दसिद्धिनिबंध.

हाग्रंथ बालबोधार्थ,

विनायकशास्त्री दिवेकर,

आणि

गोविंद विठ्ठल माहाजन,

याणीं.

बाळगंगाधरशास्त्री जांभेकर यांच्या साहाय्यानें केला

आहे.

मुकाम मुंबई.

प्रभाकर छापखान्यांत छापिला.

सन १८४३

शाके १७६४

शब्दसिद्धिनिबंध.

प्रस्तावना.

संस्कृतांतून महाराष्ट्रभाषेंत बहुत शब्द आले आहेत, त्यांत कांहीं शुद्ध संस्कृत आहेत, कांहीं त्यांचा अपभ्रंश होऊन प्राकृत झालेले आहेत. त्यांत जे शुद्ध संस्कृत आहेत, ते धातूंपासून सिद्ध झालेले आहेत किंवा रूढ आहेत, त्यांत धातूंपासून जे सिद्ध झालेले आहेत. त्यांचा मुख्य अर्थ कळण्यास धातूंचा मूळ अर्थ कळला पाहिजे, यांस्तव अक्षरानुक्रमेंकरून धातु लिहून त्यांपासून जे शब्द उत्पन्न होतात, ते बहुतकरून या पुढील कोशांत लिहिले आहेत. मूळ संस्कृत भाषेंत धातु बावीसशें आहेत, त्यांतून सुमारें पांचशें धातु या कोशांत आले आहेत, इतक्यांचा अर्थ चांगला कळल्यास पुढें संस्कृतांतही उपयोगी धातु कळावयाचे फारसे राहाणार नाहींत. रूढ संस्कृत शब्द जे आहेत, त्यांचा अर्थ इतर कोशांत पाहावा, तो समजणें हा या ग्रंथाचा उद्देश नव्हे.

उपसर्गयुक्त शब्द भाषेंत फार येतात, म्हणोन प्रथम उपसर्गांचे मुख्य अर्थ लिहून उदाहरणानीं स्पष्ट केले आहेत. परंतु यांचे अर्थ स्थलविशेषीं लिहिलेल्या अर्थाहून दुसरेही होतात, ते शब्दांची रूढि पाहून समजावें. त्यांचा अनुगम केला असतां विस्तार फार होईल.

धातूंवरून जे प्रत्यय होतात, त्यांतून मुख्य प्रत्यय व त्यांचीं रूपें कोशाचे आरंभीं लिहिलीं आहेत. हे सर्व प्रत्य-

य सर्वच धातूंवरून होतात, असें नाहीं, ते संस्कृत व्याकरणाच्या निर्बंधाप्रमाणें होतात, हें कोशांतील शब्द पाहिल्यावरून ध्यानांत येईल.

कोशांत प्रत्येक धातूपुढें त्यापासून झालेले जे शब्द ते भूतार्थक विशेषणें, इतर विशेषणें, नामें आणि भाववाचकें, या अनुक्रमें बहुधा लिहिले आहेत, आणि जेथें शब्दाचा अवयवार्थ आणि रूढ अर्थ यांचा संबंध स्पष्ट कळणार नाहीं, असें वाटलें, तेथें क्वचित् जाणविला आहे. तसेच प्रौढ शब्द जे विद्वानांच्या मात्र भाषणांत येतात, त्यांचाही अर्थ बहुधा लिहिला आहे.

या कोशाचा उपयोग हा आहे, कीं याचा अभ्यास केला असतां महाराष्ट्र भाषेंत जे संस्कृतमूलक शब्द आहेत, त्यांचा अवयवार्थ कळावा. आतां शब्दांची रूढि अवयवार्थावर क्वचित् असती, बहुधा कांहीं विशेषार्थावर असती, तो अर्थ व्यवहारांत प्रसिद्धच असतो, परंतु अशा ठिकाणींही फारकरून अवयवांचा अर्थ आणि समुदायाचा प्रसिद्ध अर्थ, यांचा कांहीं तरी संबंध असतो, त्याचा विचार करणें हा भाषेच्या अभ्यासासंबंधि एक मोठा उपयोगी व्यासंग आहे, आणि तो जाणणें हें भाषा पुरी आल्याचें एक मोठें लक्षण आहे.

परंतु जसें व्याकरण पढल्यावांचून भाषेचा निर्वाह चालत असतां व्याकरण पढण्यांत उपयोग आहे, तसा शब्दाचा रूढार्थ जरी कळत असला, तरी त्याचा अवयवार्थ कळल्यावांचून व्युत्पत्ति पक्की होत नाहीं व तेणें

करून संस्कृतादिभाषांच्याअभ्यासास उपयोग आहे.

संस्कृत भाषेंत शब्दांची मूळें जे धातु त्यांच्या मागें जे उपसर्ग ह्मणोन शब्द लागतात, त्यांचे मुख्य अर्थ कोणते; तसेंच धातूंवरून मुख्य प्रत्यय कोणते होतात, व त्यांचे अर्थ कोणते; तसेंच ते प्रत्यय झाले असतां धातूंस विकार कोणते होतात, आणि धातु आणि प्रत्यय मिळोन संधि कश्या होतात, हा सर्व प्रकार संक्षेपेंकरून प्रथम परिभाषेंत लिहून धातूंचा विल्हेवार कोश केला आहे, त्या कोशाच्या पुढें धातुसाधित शब्दांवरून स्त्री प्रत्यय होतात, ते व त्यांचे समास, आणि त्यांवरून अनेक अर्थी प्रत्यय होऊन तद्धितांत नामें होतात. त्यांच्या मुख्य जाति संक्षेपेंकरून जाणविल्या आहेत; ह्मणोन ग्रंथकरणाराची आशा आहे, की या सर्व ग्रंथाचा अभ्यास केला असतां संस्कृत शब्द जे प्राकृतांत बोलण्यामध्यें येतात, त्यांची साधनिका समजण्यास बहुधा कठीण पडणार नाहीं.

या ग्रंथाचा अभ्यास मुलांकडून करविणें त्याचा प्रकार असा की प्रथम सर्व परिभाषेंतील विषय आणि कोशापुढील तद्धित प्रत्यय, हे त्यांस पढवून मग जे शब्द त्यांच्या वाचण्यांत येतील, त्यांच्या प्रकृतिप्रत्ययांचा विचार या कोशाच्या आधारानें त्यांकडून करवावा, आणि वाचत्येवेळेस शब्दाच्या वचन विभक्ती प्रमाणें त्यांची साधनिका विचारावी, व त्यांस न समजेल तेथें समजून सांगावी. याप्रमाणें पढविलें ह्मणजे माहितगारी होत जाईल.

परिभाषा.

धातूंच्या मागें उपसर्ग लागतात, ते व त्यांचे अर्थ आणि उदाहरणें.

उपसर्ग.	अर्थ.	उदाहरण.
१ प्र	आधिक्य.	१ प्रगल्भ (अधिक धैर्यवान्).
२ परा	मागें, विपरीत.	१ परांङ्मुख (परा आङ्मुख, ह्मणजे ज्याचें तोंड मागें फिरलें तो). २ पराजित (विपरीत जय झालेला.)
३ अप	खालीं, वाईट, दूर	१ अपास्त (दूर टांकलेला).
४ सम्	चांगलें	१ सम्राट् (चांगलें राज्य करणारा). २ संस्कृत (चांगलें केलेलें)
५ अनु	मागून	१ अनुज (मागून झालेला). २ अनुग.
६ अव	न्यूनता, विशेष.	१ अवमान (कमीमान). २ अवधारण (आकलन).
७ निस्, ८ निर्	गेलेला, अत्यंत	१ निःसंशय (गेला आहे संशय ज्यापासून तो). २ निर्बंध (अधिक बंधन किंवा आग्रह).
९ दुस्, १० दुर्	दुष्ट, कठिन	१ दुर्भाषण (दुष्टभाषण). २ दुर्बोध (कळण्यास कठिण).
११ वि	गेलेला, आधिक्य, उलटें	१ विधवा. २ विज्ञान (अधिक ज्ञान). ३ विपक्ष (उलटा पक्ष).
१२ आ	किंचित्, व्याप्ति, मर्यादा	१ आकंपित (किंचित् कांपलेलें). २ आभूमंडल (सर्व पृथ्वीवर). ३ आमरण (मरे

उपसर्ग.	अर्थ.	उदाहरण.
		पर्यंत).
१३ नि	अत्यंत	१ निबोधन (खचितजाणणें). २ निपात (अत्यंतपात).
१४ अधि	ठायीं, वर	१ अध्यात्म (आत्म्यावर).
१५ अति	आधिक्य	१ अतिक्रम. २ अतिगमन. ३ अतिपान.
१६ सु	सोपें	१ सुकर (करायास सोपें). २ सुलभ (मिळायास सोपें).
१७ उत्	वर	१ उत्कृष्ट (वरओढलेला). २ उद्गत (गेलेला).
१८ अभि	आसमंतात्	१ अभिवर्तमान (आसमंतात् असणारा).
१९ प्रति	परत, उलटें, बदली.	१ प्रत्युत्तर (परतउत्तर). २ प्रतिवादी (उलटें बोलणारा). ३ प्रतिनिधि. ४ प्रतिभू (जामीन).
२० परि	समंतात्, अत्यंत	१ पर्यटन (भोंवतेंफिरणें). २ परित्याग (अत्यंत त्याग).
२१ उप	जवळ, आधिक्य	१ उपनयन (जवळनेणें). २ उपभोग (अधिकभोग).

याशिवाय अव्ययें शब्दाच्या पूर्वीं येतात, त्यांचा अर्थ.

अव्यय.	अर्थ.	उदाहरण.
१ कु	वाईट	१ कुबुद्धि (वाईट बुद्धि).

अव्यय.	अर्थ.	उदाहरण.
२ न	अभाव	१ नास्तिक.
३ अ	अभाव	१ अज्ञान.
४ अन्	अभाव	१ अनर्थ.
५ सत्	चांगलें"	१ सज्जन.
६ स	सहवर्तमान	१ सदोष (ज्यास दोष आहे तें).
७ पुनः	फिरून	१ पुनर्भव (फिरून होणें). इत्यादि. स्थल विशेषीं दोन तीनही उपसर्ग शब्दाच्या पूर्वी येतात, जसें दुर्निवार, विपर्यास इत्यादि.

धातूंवरून जे प्रत्यय होतात, त्यांतील खालीं लिहितों.

कर्तृवाचक.

१ तृ हा मुळचा प्रत्यय, त्याचा पर्यवसित प्रत्यय ता, उ० कर्ता. २ अ, उ० वस्त्रकार (वस्त्र, कृ, अ). ३ इन् उ० भावी, गुणकारी, ४ आन, उ० यजमान (यज्ञक रणारा). ५ अक, उ० याचक, पाचक. ६ अन, उ० नंदन. ७ क्विप्, (सर्वापहारी). उ० वेदवित् (वेदजाणणारा). ८ वसु याचा पर्यवसित प्रत्यय वान् उ० विद्वान्. ९ इष्णु, उ० सहिष्णु. १० उक, उ० भावुक, घातुक. ११ आलु, उ० निद्रालु. १२ उ, उ० भिक्षु, इच्छु. १३ इत्र, उ० चरित्र.

कर्मवाचक.

१ तव्य, उ० कर्तव्य. २ य, उ० कार्य, देय. ३ अनी-

य, उ० संपादनीय, गणनीय. ४ यमान, उ० क्रियमाण. ५ त्रिम, उ० कृत्रिम.

भूतार्थी.

१ त, उ० कृत, दत्त, संपादित, अपकृष्ट. २ न, उ० भिन्न, ग्लान. ३ ण, उ० ऋण. ४ म, उ० क्षाम (क्षीण). ५ ध्द, उ० रुद्ध

भाववाचक ह्मणजे व्यापारवाचक.

१ अन, उ० दान, मान. २ श याचा पर्यवसित प्रत्यय या, उ० क्रिया, शय्या. ३ घ याचा पर्यवसित प्रत्यय अ, उ० स्पर्श. ४ ति, उ० कृति, वृत्ति. ५ त याचा पर्यवसित प्रत्यय इत, उ० चरित. ६ सन् याचा पर्य० सा, उ० जिज्ञासा.

करणवाचक.

१ अन, उ० करण, कारण. २ अ, उ० क्रम, परिघ. ३ अन याचा पर्य० अना, उ० प्रार्थना.

अधिकरणवाचक.

१ अ, उ० पद, आदर्श (ज्यांत दिसतोतो, ह्मणजे आरसा). २ अन, उ० स्थान (ज्यांत राहतो तें, ह्म० घर).

इच्छार्थी.

१ स, ष, उ० चिकीर्षित (करायास इच्छिलेलें, पृ० १०). मुमुक्षु (पृ० ४० मुक्त होण्यास इच्छिणारा). शुश्रूषा (पृ० ५३ ऐकण्याची इच्छा).

प्रेरणा किंवा करविणें या अर्थी.

१ या अर्थी धातूच्या शेवटच्या अक्षरामागें अ असल्यास आ होतो, आणि इ, उ, ऋ असल्यास त्यांस अनुक्रमें ए, ओ, अर् किंवा आर् होतात. उ० ग्रासित (पृ० २५ भेडावलेला). पेषित (पृ० ३३ चूर्णकेलेला). वेधित (पृ० ५० वेधकेलेला). क्षोभित (पृ० १३ कोपविलेला). तर्षित (पृ० २४) इत्यादि.

२ धातूच्या अंतीं आ असल्यास प किंवा या होतो, आणि इकारांतधातूस आप होतें. उ० आज्ञापित (पृ० २१ किंचित् जाणविलेला). अध्यापक (पृ० ४ पढविणारा). विधायक (पृ० २८ पोसविणारा किंवा करविणारा).

अतिशयेंकरून किंवा वारंवार होणें, या अर्थी.

१ धातूस द्वित्व होऊन य प्रत्यय होतो. उ० देदीप्यमान (पृ० २७ अतिशयेंकरून किंवा वारंवार प्रकाशित होणारा).

धातूंवरून प्रत्यय झाले असतां त्यांच्या शेवटील स्वरांस किंवा शेवटल्या व्यंजनाच्या मागील स्वरांस स्थल विशेषीं गुण आणि वृद्धि ह्मणोन विकार होतात, ते झाले असतां काय पालट होतो, तो प्रकार खालच्या कोष्टकावरून समजेल.

स्वर.	गुण.	वृद्धि.	उदाहरण.
अ	अ	आ	जाप्य, जाल (पृ० २१)
आ	०	आ	
इ, ई	ए	ऐ	जेता (पृ० २१). छेद (पृ० २०). नेता (पृ० ३१) अध्याय (अधि, ऐ, अ पृ० ४) निश्चायक (निस्, चे, अक, पृ० १९). नायक (नै, अक, पृ० ३१). चैत्र (पृ० १९).
उ, ऊ	ओ	औ	प्लव (पृ० २५). पवमान (पृ० ३४). पोषित (पृ० ३४) चोषित (पृ० १९) रावण (पृ० ४४). क्षौर (पृ० १३). भाव, प्रभाव इत्यादि. (पृ० ३८)
ऋ, ॠ	अर्	आर्	कर्तव्य (पृ० ९). निस्तरण (पृ० २४). संपर्क (पृ० ३४). कार्य (पृ० ९). ग्राह्य (पृ० १६). विदारित (पृ० २८).
ऌ	अल्	आल्	कल्पित, काल्पनिक.
ए, ऐ	ए	ऐ (आय्, आ). गायक (पृ० १६). त्रात (पृ० २५).	
ओ, औ	ओ	औ (आव्, आ).	

उपसर्ग आणि धातु यांमध्यें किंवा धातु आणि प्रत्यय यांमध्यें संधि होऊन दोन अक्षरें मिळून एक अक्षर होतें, त्या संधीचे मुख्य प्रकार समजण्याकरितां खालीं कोष्टक लिहि-तों—

	अ	आ	इ	ई	उ	ऊ	ऋ	ॠ	ऌ	ए	ऐ	ओ	औ
अ,आ	आ	आ	ए	ऐ	ओ	ओ	अर्, आर्	अर्, आर्	अल्, आल्	ऐ	ऐ	औ	औ
इ,ई	य	या	इ	ई	यु	यू	यृ	यॄ	यॢ	ये	यै	यो	यौ
उ,ऊ	व	वा	वि	वी	उ	ऊ	वृ	वॄ	वॢ	वे	वै	वो	वौ
ऋ,ॠ	र	रा	रि	री	रु	रू	ऋ	ॠ	ऌ	रे	रै	रो	रौ
ऌ	ल	ला	लि	ली	लु	लू	०	०	०	ले	लै	लो	लौ
ए	अय	अया	अयि	अयी	अयु	अयू	अयृ	अयॄ	अयॢ	अये	अयै	अयो	अयौ
ऐ	आय	आया	आयि	आयी	आयु	आयू	आयृ	आयॄ	आयॢ	आये	आयै	आयो	आयौ
ओ	अव	अवा	अवि	अवी	अवु	अवू	अवृ	अवॄ	अवॢ	अवे	अवै	अवो	अवौ
औ	आव	आवा	आवि	आवी	आवु	आवू	आवृ	आवॄ	आवॢ	आवे	आवै	आवो	आवौ

यांत **अ, आ** यांच्यापुढें **अ** आला असतां दोघां-च्या ठिकाणीं **आ** होतो; इ आला असतां ए होतो; इत्या-दि साधारण नियम समजावे. यांचीं उदाहरणें पुढील को-

ग्रांन बहुत पाहाण्यांत येतील, ह्मणोन तीं विस्ताराच्या भयानें एथें लिहीत नाहीं. वरील नियमास कोठें क्वचित् अंतर पडतें, ते सर्व विशेष संस्कृत व्याकरणाच्या पूर्ण अभ्यासावांचून कळणार नाहींत. व्यंजनाच्या संधीविषयीं मुख्य नियम हे आहेत. १ स्थलविशेषीं क, च, ट, त, प यांस अनुक्रमें ग, ज, ड, द, ब हे होतात. उ० ऋक्, वेद, ऋग्वेद. इत्यादि. २ स, न यांस अनुक्रमें ष, ण होतात. उ० दुष्कार (दुस्, कार पृ० १०) प्रकीर्ण (प्रकीर्, न पृ० ११). ३ भूतार्थक त प्रत्ययाच्या मागें श, ष असल्यास त यास ट होतो. उ० दृष्ट (दृश्, ता पृ० २७). कृष्ट (कृष्, त पृ० ११). ४ त, थ, द, ध, न यांस च, छ, ज, झ, ञ यांतील कोणताही वर्ण पुढें असतां अनुक्रमें च, छ, ज, झ, ञ होतात. उ० उज्जीवन (उत्, जीवन पृ० २१). इ० ५ स्थलविशेषीं च, ज यांस अनुक्रमें क, ग होतात. उ० संपृक्त (पृ० ३४). राग (पृ० ४३). ६ त, द यांस न पुढें असतां न होतो. उ० उन्नय (पृ० ३१). छन्न, छिन्न. (पृ० २०). इत्यादि.

शब्दसिद्धिनिबंध.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		अ.
१ अंक्	चिन्हकरणें	भू० वि० १ अंकित. वि० २ निरंक. ३ सांक. ना० ४ पर्यंक (पलंग). भा० ५ अंक. ६ अंकन.
२ अंच्	जाणें (आच्, आक्, आङ्, ईच्)	वि० १ अर्वाचीन (आलीकडील). २ अर्वाक् (आलीकडे). ३ अवाक् (खालीं). ४ तिर्यक् (आडवें). ५ प्राचीन. ६ प्राच (प्राचीन. स० वि० ७ पराङ्मुख. ८ प्राङ्मुख (पूर्वेकडेस ज्याचें तोंड आहे तो). ९ प्रत्यङ्मुख (पश्चिमेकडेस ज्याचें तोंड आहे तो). ना० १० अंचल (आंचळी). ११ उदीची (उत्तर). १२ प्राची (पूर्व). १३ प्रतीची (पश्चिम).
३ अंग्	जाणें	वि० १ निरंग. २ दुरंग. ३ व्यंग. ४ अव्यंग. ५ स्वंग. ६ प्रत्यंग. ७ उपांग (गौणअंग). ८ सांग. ना० ९ अग. १० अंगना (स्त्री). ११ अपांग (नेत्रकटाक्ष).
४ अंज्	चोपडणें (अंग)	ना० १ अभ्यंग (सर्वावयवांस तेल लावणें). २ अंजन (डोळ्यांस चोळणें अथवा चोळा-

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		याचा पदार्थ).
५ अंज्	स्पष्टकरणें	वि० १ अभिव्यंजक (सूचक). २ व्यंजक (सूचक). ३ अभिव्यक्त (स्पष्ट). ना० ४ अभिव्यक्ति. ५ व्यंजन (चटणी, भाजी इ०)
६ अट्	हिंडणें	ना० १ अटन (हिंडणें). २ पर्यटन (फेरी).
७ अत्	सर्वदा संचारकरणें	ना० १ पदाति (पायदळ). २ आत्मा. ३ अतिथि (पाहुणा). ४ अध्यात्म (वेदांत).
८ अद्	खाणें	वि० १ अद्य (खाण्याजोगें). ना० २ अन्न. भा० ३ अदन (खाणें)
९ अन्	वांचणें	वि० १ निःप्राण. ना० २ प्राण (हृदयस्थवायु). ३ अपान (गुदस्थवायु). ४ समान (बेंबीचे जागचा वायु). ५ उदान (गळ्याचे ठिकाणचा वायु). ६ व्यान (सर्वशरीरसंचारी वायु). ७ प्राणी. भा० ८ प्राणन (जगणें).
१० अंध्	दिसण्याचा नाशहोणें.	वि० १ अंध (आंधळा). २ अंधक (अपभ्रंश). ना० ३ अंधकार. ४ आंध्य (आंधळेपणा).
११ अय्	जाणें	ना० १ आयुष्य.
१२ अर्घ्	किमतपडणें.	वि० १ समर्घ (सवंग). २ महार्घ (महाग) ना० ३ अर्घ्य (पूजासामग्री). ४ अर्घ (किमत).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
१३अर्च्	पूजाकरणें	भू० १ अर्चित (पूजाकेलेला). वि० २ अर्च्य (पूजाकरायास योग्य). ना० ३ अर्चक (पूजाकरणारा). भा० ४ अर्चन. ५ अर्चा.
१४अर्ज्	संपादणें	भू० १ अर्जित. २ उपार्जित. ना० ३ अर्जक (मिळविणारा). भा० ४ अर्जन. ५ उपार्जन. ६ उपार्जना.
१५अर्थ्	मागणें	भू० १ प्रार्थित (इच्छित). २ समर्थित. ३ अनर्थित. वि० ४ समर्थ. ५ अन्वर्थ (यथार्थ). ६ निरर्थक. ७ व्यर्थ. ना० ८ अर्थी. ९ प्रार्थक (मागणारा). १० अर्थ. ११ अनर्थ. भा० १२ प्रार्थना. १३ समर्थन (प्रतिपादन).
१६अर्ह्	पूजाकरणें	वि० १ अर्ह (योग्य). भा० २ अर्हा (पूजा).
१७अल्	शोभविणें	वि० १ अलंकरिष्णु. २ अलंकृत. ३ अलंकार्य. ना० ४ अलंकार. ५ अलंक्रिया (अलंकार). भा० ६ अलंकरण.
१८अश्	खाणें	भू० १ अशित (खाल्लेलें). २ प्राशित (प्यालेलें). भा० ३ अशन (खाणें). ४ प्राशन (पिणें). ५ निरशन (उपास).
१९अंश्	वांटणें	ना० १ अंश (वांटा). स० २ अंशी (वांटेदार). ३ निरंशी (ज्यास वांटा नाहींतो).
२०अस्	असणें	ना० १ सत्ता (असणें). २ सत्व (असणें). ३ सत् (असणारें, चांगलें). ४ असत् (मिथ्या).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
२१ अस्	फेंकणें	ना० १ अस्त्र (फेंकायाचें). २ व्यसन. भा० ३ निरस्त. ४ परास्त. ५ पर्यस्त.
२२ आप्	व्यापणें	भू० १ व्याप्त. वि० २ व्याप्य. ३ व्यापक. ४ व्यापी. भा० ५ व्यापन.
२३ आप्	मिळविणें	भू० १ प्राप्त. २ समाप्त. ३ अवाप्त (मिळविलेलें). वि० ४ प्राप्य (मिळायाजोगें). ५ समाप्य (संपवायाजोगें). ना० ६ आप्त (विश्वासबसलेला). भा० ७ प्राप्ति. ८ समाप्ति. ९ समापन.
२४ आमय	रोगहोणें	वि० १ निरामय (रोगनसणें). २ अनामय. ना० ३ आम (आंव). ४ आमय (रोग).

इ.

२५ इ	जाणें (अय्, आय्)	भू० १ उदित (उगवलेला). २ अन्वित (संबद्ध). वि० ३ विपरीत. ना० ४ समय. ५ अन्वय. ६ आय (जमा). ७ व्यय. ८ उदय. ९ प्रत्यय. १० पर्याय. ११ अव्यय. (ज्याचा नाश नाहीं तो). १२ सहाय. १३ असहाय. १४ उपाय. १५ अभ्युदय (देवऋद्धि). १६ विपर्यय (विरुद्ध).
२६ इ	अध्ययनकरणें (अय्, आय्)	भू० १ अधीत (म्हटलेलें). २ अनधीत. ना० ३ अध्याय (पाठ). ४ अध्यापक (गुरु). ५ अध्येता (पढणारा). ६ उपा-

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		ध्याय. ७ अध्याप्य (शिष्य). ८ स्वाध्याय (पढावयाचा दिवस). ९ अनाध्याय (ओपढावयाचा दिवस नव्हे तो). भा० १० अध्ययन. ११ अध्यापन (पढविणें).
२७ इगि	जाणें	ना० १ इंगित (तात्पर्य).
२८ इध्	पेटविणें	ना० १ समित् (समिध). २ इंधन (फांटें).
२९ इर्	जाणें	भू० १ प्रेरित (पाठविलेला). वि० २ प्रेरक. भा० ३ प्रेरणा. ४ प्रेरण.
३० इष्	इछिणें	भू० १ प्रेषित. २ इछित. ३ इष्ट. ४ अनिष्ट. वि० ५ प्रेषक. ६ प्रेष्य (चाकर). भा० ७ प्रेषण. ८ अन्वेषण (शोधणें). ९ इछा.
३१ ईक्ष	पाहणें	भू० १ परीक्षित (परीक्षा केलेला). वि० २ अपेक्षणीय. ३ उपेक्षणीय (दुर्लक्ष्य करायाजोगें). ४ अनुपेक्षणीय. ना० ५ परीक्षक. ६ प्रेक्षक (विचारी). भा० ७ ईक्षण (पाहाणें). ८ प्रेक्षा (विचार). ९ परीक्षण. १० परीक्षा. ११ उपेक्षा (हयगय). १२ अपेक्षा (गरज). १३ उत्प्रेक्षा (अलंकारविशेष). १४ समीक्षण (विचार). १५ अपेक्षण (पाहाणें). १६ निरीक्षण. १७ प्रतीक्षण (वाटपाहणें). १८ प्रतीक्षा. १९ संवीक्षण (शोध).
३२ ईर्	कांपणें	ना० १ समीर (वारा). २ समीरण (अर्थ

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		तोच).
३३ ईर्ष्य्	हेवाकरणें	भा० १ ईर्ष्या.
३४ ईश्	शक्तिअसणें	वि० १ निरीश. ना० २ ईश. ३ अधीश. ४ ईश्वर.
		उ.
३५ उष्	जाळणें	वि० १ उष्ण. ना० २ उषर (खाजण). भा० ३ उष्मा (उन्हाळा).
३६ ऊन्	कमीकरणें	भू० १ ऊनित (कमीकेलेलें). वि० २ ऊन. ३ न्यून.
३७ ऊर्ज्	बळकरहोणें	भू० वि० १ ऊर्जित.
३८ ऊर्णु्	वेष्टणें	ना० १ ऊर्णा (लोंकर). २ ऊर्णनाभि (सुतेरा).
३९ ऊह्	कल्पिणें	वि० १ दुरूह (विचारकरायासकठिण). ना० २ ऊह. ३ व्यूह. ४ समूह (समुदाय).
		ऋ.
४० ऋ	जाणें	वि० १ ऋणी. २ अनृणी. ना० ३ ऋण.
४१ ऋज्	जाणें	वि० १ ऋजु (सरळ). ना० २ आर्जव (सरळपणा).
४२ ऋध्	वाढणें किंवा वाढविणें	भू० वि० १ समृद्ध (वाढलेलें). ना० २ समृद्धि. ३ ऋद्धि. ४ अर्ध.
		क.
४३ कच्	बांधणें	भू० वि० १ विकच (फुललेलें). ना० २ कच (केंस).
४४ कट्	जाणें	भू० वि० १ प्रकटित. वि० २ प्रकट (प्रसि-

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		द्र). ३ विकट (व्यास). ४ निकट (फारजवळ). ५ उत्कृष्ट (फार). ना० ६ क्रटक (कडें). ७ संकट. भा० ८ अकटोविकट.
४५ कड्	कांडणें	ना० १ कंडनी (मुसळ). भा० २ कंडन (कांडणें).
४६ कंडु	खाजिवणें	ना० १ कंडु.
४७ कथ्	सांगणें	वि० १ कथनीय. २ कथक ना० ३ कथानक. ४ कथा. ५ कथन.
४८ कप्	कांपणें	भू० वि० १ कंपित. २ अनुकंपित. वि० ३ अनुकंपनीय (दयाकरायाजोगा). ना० ४ अनुकंपा (दया). भा० ५ कंपन. ६ कंप.
४९ कम्	इछिणें	वि० १ काम्य. २ कमनीय (सुंदर). ३ कांत (सुंदर). ४ निष्काम. ५ सकाम. ६ प्रकाम. ना० ७ कामुक. ८ कांता (स्त्री). ९ कांत (नवरा). १० काम. ११ कांति. १२ कामी.
५० कर्ण्	ऐकणें	ना० १ कर्ण (कान). भा० २ आकर्णन (ऐकणें)
५१ कर्त्	कापणें	भू० वि० १ कर्तित. ना० २ विकर्तन (सूर्य). ३ कर्त्री (कातर). भा० ४ कर्तन (कापणें).
५२ कल्	शब्दकरणें	वि० १ कल (अव्यक्तमधुर). ना० २ कलकल.
५३ कल्	जाणें	भू० वि० १ आकलित. ना० २ काल. भा०

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		५ आकलन.
५४ कव्	काव्यकरणें	ना० १ कवि. २ काव्य. ३ कविता. ४ कवन.
५५ कष्	दुःखदेणें	ना० १ कष (कसोटी). २ कष्ट. ३ कषाय.
५६ कस्	जाणें	वि० १ निष्कासनीय. २ निष्कास्य. ना० ३ निष्कासक (बाहेरकाढणारा). भा० ४ निष्कासन.
५७ कांक्ष्	इछिणें	भू० वि० १ कांक्षित. वि० २ साकांक्ष. ३ निराकांक्ष. ना० ४ कांक्षा. ५ आकांक्षा.
५८ काच्	प्रकाशणें	ना० १ काच (कांच). २ कांचन (सोनें).
५९ काश्	प्रकाशणें	भू० वि० १ प्रकाशित. २ विकसित (उघडलेलें). वि० ३ प्रकाश्य. ४ प्रकाशमान. ५ संकाश (सारखें). ना० ६ प्रकाशक. ७ प्रकाश. ८ अवकाश. ९ आकाश. भा० १० विकास. ११ विकसन.
६० कास्	वाईट शब्दकरणें	ना० १ कास (खोकला).
६१ कित्	रोगदूरकरणें	भू० वि० १ चिकित्सित. वि० २ चिकित्स्य. ३ चिकित्सनीय. ४ दुश्चिकित्स्य. ना० ५ चिकित्सक (वैद्य).
६२ कुच्	प्रतिबंधकरणें	भू० वि० १ आकुंचित. २ संकुचित. वि० ३ संकोची. ४ संकोचनीय. ना० ५ कुच (स्तन). ६ संकोचक. भा० ७ आकुंचन. ८ संकोच.

धातु. अर्थ. उदाहरण.

६३ कुट्ट घाईटकाम करणे. } ना० १ कुट्टनी (कुंटणी).

६४ कुट्ट कुटणें. भू० वि० १ कुट्टित (कुटलेलें). भा० २ कुट्टन (कुटणें).

६५ कुठ् प्रतिबंधकरणें. } भू० वि० १ कुंठित. २ अकुंठित. यापासून प्राकृत खुंटी, खुंटा.

६६ कुड् भाजणें ना० १ कुंड. प्रा० कुंडी.

६७ कुत्स् निंदाकरणें भू० वि० १ कुत्सित. ना० २ कुत्सा. ३ कुत्सन.

६८ कुथ् क्लेशभोगणें यापासून प्रा० कुंथणें.

६९ कुप् रागेंभरणें भू० वि० १ कुपित. २ कोपित. वि० ३ कोपी. ना० ४ कोप. भा० कोपन.

७० कुल् संपादणें भू० वि० १ आकुलित (घाबरलेला). वि० २ आकुल. ३ व्याकुल. ४ संकुल (मिसळलेलें). ना० ५ कुलं.

७१ कुश् एकत्र मिळविणें } ना० १ कोश (आमदारखाना किंवा कोशेटा).

७२ कूज् शब्दकरणें ना० १ कूजित (पक्ष्याचें ओरडणें).

कृ.

७३ कृ करणें (कर, कार) } भू० वि० १ कृत. २ प्रकृत. ३ अपकृत. ४ संस्कृत. ५ विकृत. ६ अधिकृत. ७ परिष्कृत. ८ उपस्कृत. ९ अपकृत (साधायाचें नव्हतें). १० अंगीकृत. ११ आविष्कृत. १२ चिकी-

धातु. अर्थ. उदाहरण.

र्षित. १३ सत्कृत. १४ स्वीकृत. वि० १५ करिष्णु. १६ कृत्रिम. १७ कर्तव्य. १८ क्रियमाण. १९ अपकारक. २० अपकरिष्णु. २१ अपकर्तव्य. २२ अपकार्य. २३ संस्कार्य. २४ सुकर. २५ उपकार्य. २६ उपकारक. २७ अंगीकार्य. २८ चिकीर्षु. २९ दुष्कर. ३० स्वीकार्य. ३१ अनुकारक. ना० भा० ३२ कर्ता. ३३ कारक. ३४ कर्म. ३५ कार्य. ३६ कारण. ३७ क्रिया. ३८ कृति. ३९ कारण. ४० प्रकार. ४१ प्रकरण. ४२ प्रक्रिया. ४३ प्रकृति. ४४ अपकार. ४५ अपकारी. ४६ अपकरण. ४७ अपक्रिया. ४८ अपकृति. ४९ संस्कार. ५० संस्कारी. ५१ निष्कृति. (प्रायश्चित्त). ५२ विकार. ५३ विकृति. ५४ आकार. ५५ अधिकार. ५६ अधिकारी. ५७ अधिकरण. ५८ सुकृत (पुण्य). ५९ प्रतीकार. (निवारण). ६० प्रतिकृति. ६१ परिष्कार. ६२ उपकर्ता. ६३ उपकरण. ६४ उपकार. ६५ उपकारी. ६६ आकृति. ६७ अहंकृति. ६८ अहंकार. ६९ अंगीकार. ७० आविष्करण. ७१ कृत्य. ७२ विकीर्षा. ७३ दुष्कर्म. ७४ दुष्कृति. ७५ निर्विकार. ७६ व्याकरण. ७७ संकर. ७८ सत्कार. ७९ सत्कृति. ८० सत्क्रिया. ८१ स्वीकार.

धातु. अर्थ. उदाहरण.

८२ अनुकार. ८३ अनुकरण. ८४ अनुकृति. ८५ अनुक्रिया. इ०

७४ कृत् कीर्तिकरणें भू० वि० १ कीर्तित. वि० २ कीर्तिमान्. ना० ३ कीर्ति. ४ अपकीर्ति. ५ दुष्कीर्ति. ६ सुकीर्ति. भा० ७ कीर्तन. ८ संकीर्तन.

७५ कृप् दयाकरणें वि० १ कृपालु. ना० २ कृपा.

७६ कृप् दुर्बलअसणें ना० १ कृपण.

७७ कृश् कमीकरणें वि० १ कृश (रोडका). २ कार्श्य (रोडकेपणा).

७८ कृष् ओढणें भू० वि० १ आकर्षित. २ आकृष्ट. ३ अपकृष्ट. वि० ४ उत्कृष्ट. ५ निकृष्ट. ना० ६ निष्कर्ष (सारांश). ७ आकर्षक (ओढणारा). भा० ८ आकर्षण. ९ अपकर्ष. १० अनुकर्ष (एकेजागचें दुसरें जागीं नेणें).

७९ कृष् रेघकाढणें भा० १ कृषि (शेतकाम).

८० कॄ उडिवणें. वि० १ संकीर्ण (पसरलेलें किंवा मिश्रित). २ प्रकीर्ण.

८१ क्रद् रडणें भू० वि० १ क्रंदित. ना० २ क्रंदन (रडणें). ३ आक्रंदन.

८२ क्रम् चालणें भू० वि० १ संक्रमित. २ उत्क्रांत (वर किंवा बाहेर चाललेला). ३ निष्क्रांत (निघालेला). ४ आक्रांत. ५ अतिक्रांत.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		६ उपक्रांत (आरंभिलेलें). ना० ७ क्रम (एकापुढेंएक). ८ प्रक्रम (व्यवहार) ९ अपक्रम (वाईटरीति). १० अनुक्रम. ११ विक्रम. १२ पराक्रम. १३ चक्र (चाक). १४ उपक्रम. १५ व्युत्क्रम. भा० १६ क्रमण. १७ क्रांति. १८ संक्रांति. १९ अतिक्रम इत्यादि.
८३ क्लिश्	दुःख देणें	भू० वि० १ क्लिष्ट. ना० २ क्लेश. ३ अक्लेश.
८४ क्वथ्	कढविणें	भू० वि० १ क्वथित. ना० २ क्वाथ (काढा).
८५ क्षण्	कापणें	ना० १ क्षति. २ क्षति. ३ क्षत्रिय (क्षतापासून रक्षण करणारा).
८६ क्षम्	क्षमा करणें	वि० १ क्षांत. ना० २ क्षमी. ३ क्षमा.
८७ क्षर्	पाझरणें	वि० १ क्षर (नाशवंत). २ अक्षर. ना० क्षार. भा० ३ क्षरण (पाझर).
८८ क्षल्	धुणें	भू० वि० १ प्रक्षालित. भा० २ प्रक्षालन. ३ क्षालन.
८९ क्षि	कमी होणें	भू० वि० १ क्षीण. वि० २ अक्षय. ३ क्षयी. ना० ४ क्षय.
९० क्षिप्	उडविणें	भू० वि० १ प्रक्षिप्त. २ क्षिप्त. भा० ३ संक्षेप. ४ आक्षेप. ५ निक्षेप (ठेव). ६ उत्क्षेप. ७ अपक्षेप. ८ अपक्षेपण. ९ प्रक्षेप.
९१ क्षुद्	पीठ करणें	भू० वि० १ क्षुण्ण. ना० २ क्षोद (चूर्ण).
९२ क्षुध्	भूक लागणें	भू० वि० १ क्षुधित. वि० २ क्षुधालु. ना० ३ क्षुधा.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
९३ क्षुभ्	उचंबळणें	भू० वि० १ क्षुब्ध. २ क्षुभित. ३ क्षोभित. वि० ४ क्षोभ्य. ५ क्षोभी. ना० ६ क्षोभ.
९४ क्षुर्	कापणें	ना० १ क्षुर (वस्तरी). भा० २ क्षौर (हजामत).

ख.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
९५ खड्	फोडणें	भू० वि० १ खंडित. २ अखंडित. वि० ३ खंडनीय. ४ अखंड. ना० ५ खड्ग. ६ खंड. भा० ७ खंडन.
९६ खन्	खणणें	भू० वि० १ खनित. २ उत्खात (उपटलेला). ना० ३ खनि (खाण). ४ खात (खळी). भा० ५ खनन. या धातूपासून प्राकृत खांच, खळगा, खांचरइ०
९७ खर्ज्	खाजिवणें	ना० १ खर्जु (खरूज). भा० २ खर्जन (खाजिवणें).
९८ खाद्	खाणें	भू० वि० १ खादित. वि० २ खाद्य. ३ खादक.
९९ खिद्	दुःखपावणें	भू० वि० १ खिन्न. २ खेदित. ना० ३ खेद.
१०० ख्या	सांगणें	भू० वि० १ प्रख्यात. २ विख्यात. ३ आख्यात. ४ असंख्यात. वि० ५ ख्यातिमान्. ना० ६ ख्याति. ७ संख्या. ८ आख्या. ९ आख्यायिका (कथा).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		ग.
१०१ गण्	मोजणें	भू० वि० १ परिगणित. २ अगणित. ना० ३ गण (समुदाय). ४ गणक (जोशी). ५ गणित. ६ अवगणना (अपमान). भा० ७ गणन (मोजणें).
१०२ गद्	बोलणें	ना० १ गद्य (फक्किका).
१०३ गंध्	वाहणें, वासदेणें	ना० १ गंध. २ दुर्गंध. ३ सुगंध. ४ अतिगंध.
१०४ गम्	चालणें	भू० वि० १ अभ्यागत. २ अपगत (गेलेलें). ३ अधिगत. ४ अनुगत. ५ अवगत. ६ उद्गत. ७ गत. ८ आगत (आलेला). वि० ९ गम्य. १० अगम्य. ११ अधिगम्य. १२ अनुगामी. १३ सुगम. (सोपें). १४ जंगम (जाणारें). १५ आगामी. १६ सुसंगत. १७ विसंगत. ना० १८ गमन. १९ संगति. २० सद्गति. २१ गति. २२ अवगम (ज्ञान). २३ अभ्युपगम (कबुलायत). २४ दुर्गति. २५ अधिगम (प्राप्ति किंवा ज्ञान). २६ अनुगम (आद्यंत एकरूपानें वाक्यादिकांचें बंधन). २७ गंगा. २८ अवगति. २९ संगम. ३० स्वागत. ३१ आगम (शास्त्र). ३२ गमक (हेतु). ३३ गात्र (अवयव). ३४ गो (गाई). ३५

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		निगम (निकाल). ३६ दुर्गम. ३७ दुर्ग (किल्ला).
१०५ गर्ज्	शब्दकरणें	भू० वि० १ गर्जित. भा० २ गर्जना.
१०६ गर्व्	गर्विष्ठहोणें	भू० वि० १ गर्वित. ना० २ गर्व.
१०७ गर्ह्	निंदाकरणें	भू० वि० १ गर्हित. २ विगर्हित. वि० ३ गर्ह्य. ४ गर्हणीय (निंद्य). भा० ५ गर्हा. ६ विगर्हा (निंदा).
१०८ गल्	गळणें	भू० वि० १ गलित. २ गालित (गाळलेला). ३ निर्गलित (सारांश काढलेला). ना० ४ गल (गळा). भा० ५ गालन.
१०९ गल्भ्	धीरअसणें	वि० १ प्रगल्भ (धैर्यवान्).
११० गवेष्	शोधकरणें	याधातूपासून गवसणें.
१११ गह्	अगम्यअसणें	वि० १ गहन (जाण्यासकठिण). ना० २ गहन (रान).
११२ गाध्	शोधणें	वि० १ अगाध (अगम्य).
११३ गुड्	वेष्टणें	भा० १ गुंडन (गुंडाळणें).
११४ गुण्	बोलाविणें	वि० १ गुणी. ना० २ गुण. ३ निर्गुण. ४ सगुण. ५ दुर्गुण. ६ सद्गुण.
११५ गुण्	मोजणें	भा० १ गुणन. २ गुणनिका.
११६ गुप्	राखणें	भू० वि० १ गुप्त. २ गोपित. वि० ३ गोप्ता (रक्षणकरणारा). ४ गोपनीय. ना० ५ गोप (गोवारी). भा० ६ संगोपन. ७ गोपन (गुप्तराखणें).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
११७ गुंफ्	बांधणें	भू० वि० १ गुंफित. ना० २ गुंफा. ३ गुंफक (माळी). भा० ४ गुंफन.
११८ गूह्	झांकणें	भू० वि० १ गूढ. २ निगूढ. ना० ३ गुत्य. ४ गुहा.
११९ गृ	शब्दकरणें	ना० १ गुरु. २ उपगुरु. भा० ३ उद्गार.
१२० गृह्	घेणें	भू० वि० १ गृहीत. २ अनुगृहीत. ३ निगृहीत. वि० ४ गृत्य. ५ ग्रात्य. ६ गृही. ७ अनुग्रात्य. ८ अनुगृहीता. ९ दुराग्रही. १० अनुग्राहक. ११ आग्रही. १२ निग्रही. १३ निराग्रही. ना० १४ गृह. १५ ग्राहक (गिराईक). १६ गृहिणी (घरकरीण). १७ ग्राह (सुसर). भा० १८ ग्रहण. १९ संग्रह. २० अनुग्रह. २१ आग्रह. २२ दुराग्रह. २३ निग्रह. २४ निराग्रह. २५ परिग्रहण. २६ विग्रह (समास).
१२१ गै (गा, गाय्)	गाणें	ना० १ गायक. २ गीति. ३ गीत. भा० ४ गान. ५ गायन.
१२२ ग्रथ्	बांधणें	भू० वि० १ ग्रथित (बांधलेला). ना० २ ग्रंथ. ३ ग्रंथि. (गांठ). ४ ग्रंथकार. भा० ५ ग्रथन
१२३ ग्रस्	गिळणें	भू० वि० १ ग्रस्त. २ ग्रसित. वि० ३ ग्रास्य. ४ ग्रासी. ना० ५ ग्रास. ६ सुग्रास.
१२४ ग्लै (ग्ला)	हर्षनाशहोणें	भू० वि० १ ग्लान. ना० २ ग्लानि.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		घ.
१२५ घट्	यत्नकरणें	भू० वि० १ अघटित. २ घटित. ३ उद्घटित. वि० ४ दुर्घट. ५ घटक. ना० ६ घट. भा० ७ उद्घाटन. ८ घटना. ९ उद्घाट.
१२६ घुर्	भयंकरशब्दकरणें	वि० १ घोर (भयंकर). याधातूपासून घोरणें.
१२७ घुष्	शब्दकरणें	ना० १ घोष. भा० २ घोषण. ३ घोषणा.
१२८ घृ	शिंपणें	भा० १ अभिघार (शिंपणें किंवा कालिवणें).
१२९ घृष्	घांसणें	भू० वि० १ घृष्ट. २ घर्षित. वि० ३ घर्षिता. ४ घर्ष्य. भा० ५ घर्षण.
१३० घ्रा	वासघेणें	भू० वि० १ अवघ्रात. २ आघ्रात. ना० ३ घ्राण. भा० ४ अवघ्राण. ५ आघ्राण.
		च.
१३१ चक्	प्रकाशणें	भू० वि० १ चकित (दीपावलेला).
१३२ चक्ष्	पाहणें	वि० १ विचक्षण. २ चक्षुष्मान्. ना० ३ चक्षु. भा० ४ विचक्षणा.
१३३ चड्	रागेंभरणें	वि० १ चंड. २ प्रचंड. ना० ३ चंडी (देवी).
१३४ चद्	प्रकाशणें	ना० १ चंद्र. २ चंद्रिका.
१३५ चम्	खाणें	वि० १ आचमनीय. भा० २ आचमन.
१३६ चर्	चालणें	भू० वि० १ आचरित. वि० २ दुराचारी. ३ विचारी. ४ उच्चार्यमाण. ५ विचारणीय. ६ अविचारी. ७ उच्चार्य. ८ अनुच्चार्य.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		९ व्यभिचारी. १० अभिचारी. ना० ११ अनुचर (चाकर). १२ चरित्र. १३ आचार्य. १४ चरण. १५ आश्चर्य. भा० १६ प्रचार. १७ संचार. १८ दुराचार. १९ दुराचरण. २० आचार. २१ आचरण. २२ उपचार. २३ परिचार. २४ विचार. २५ विचारणा. २६ चर्या. २७ उच्चार. २८ उच्चारण. २९ अतिचर. ३० अतिचार. ३१ अभिचार. ३२ व्यभिचार.
१३७ चर्च्	भाषणकरणें	भा० १ चर्चा (वाद).
१३८ चर्व्	चावणें	भू० वि० १ चर्वित. भा० २ चर्वण.
१३९ चल्	कांपणें	भू० वि० १ चलित. वि० २ चंचल. ३ चल. ४ अचल. ५ निश्चल. भा० ६ चालन. ७ चालना. या धातूपासून प्राकृत चाळणें.
१४० चि	मिळविणें	भू० वि० १ संचित. २ निश्चित. ३ परिचित. ४ अपरिचित. वि० ५ निश्चायक. भा० ६ संचय. ७ निश्चय. ८ परिचय. ९ अपचय. १० उपचय. ११ समुच्चय.
१४१ चिट्	चाकरीकरणें	ना० १ चेट (गुलाम). २ चेटी (दासी).
१४२ चित्	विचारकरणें	भू० वि० १ चिंतित. २ अचिंतित. वि० ३ चिंत्य. ४ अचिंत्य. ना० ५ चित्त. ६ चिंता. भा० ७ चेतना.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
१४३ चित्र	नानाप्रकारचे रंग देणें	भू० वि० १ चित्रित (चितरलेलें). वि० २ विचित्र. ना० ३ चित्र (आश्चर्य).
१४४ चिन्ह	खूण करणें	भू० वि० १ चिन्हित. ना० २ सुचिन्ह. ३ दुश्चिन्ह. ४ चिन्ह.
१४५ चिल्	नेसणें	ना० १ चैल (वस्त्र). वि० २ सचैल (वस्त्रसुद्धां).
१४६ चुद्	प्रेरणा करणें	भू० वि० १ चोदित. वि० २ चोद्य. ३ अचोद्य. भा० ४ चोदना (आज्ञा).
१४७ चुब्	चुंबणें	भू० वि० १ चुंबित. २ अचुंबित. भा० ३ चुंबन.
१४८ चुर्	चोरणें	ना० १ चोर.
१४९ चुल्	रचणें	ना० १ चुल्ली (चूल).
१५० चूण्	संकोच करणें	या धातूपासून चुण्या.
१५१ चूर्ण्	पूड करणें	भू० वि० १ चूर्णित. ना० २ चूर्ण. या धातूपासून प्राकृत चूर्णिका.
१५२ चूष्	चोखणें	भू० वि० १ चोषित. वि० २ चोष्य. भा० ३ चोषण.
१५३ चेष्ट	हालणें	भू० वि० १ चेष्टित. २ विचेष्टित. वि० ३ कुचेष्ट. ४ सचेष्ट. ५ निश्चेष्ट. भा० ६ चेष्टा.
१५४ च्यु	गळून पडणें	भू० वि० १ च्युत (गळून पडलेला). ना० २ अच्युत (विष्णु).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		छ.
१५५ छद्	झांकणें	भू० वि० १ छन्न. २ आच्छन्न. ३ आच्छादित. वि० ४ आच्छाद्य. ५ आच्छादक. ना० ६ छत्र. ७ छद्म. (कपट). भा० ८ आच्छादन.
१५६ छिद्	कापणें	भू० वि० १ अविच्छिन्न. २ अवच्छिन्न. ३ छिन्न. ४ उच्छिन्न. वि० ५ अवच्छेदक. ६ उच्छेदक. ७ उच्छेदनीय. ८ उच्छेद्य. ना० ९ विच्छेद (अंतर). १० छेद. भा० ११ अवच्छेद (कापणें). १२ उच्छेद. १३ उच्छेदन.
१५७ छिद्र्	भोंसकणें	वि० १ सच्छिद्र. २ अच्छिद्र. ना० ३ छिद्र. (भोंक).
		ज.
१५८ जन्	उत्पन्नहोणें	भू० वि० १ जात. २ अभिजात. (सभ्य किंवा सत्कुलीन). वि० ३ निर्जन. ४ अजन्मा (ज्यास जन्म नाहीं तो). ५ विजातीय. ६ सजातीय. ७ आजन्म (जन्मपर्यंत). ना० ८ जंतुः ९ जननी. १० जन. ११ दुर्जन. १२ सज्जन. १३ जन्म. १४ अनुजन्मा. १५ अनुज. १६ प्रजा. १७ अभिजन (कुटुंब किंवा चाकर). भा० १८ जनन.
१५९ जप्	मनांत बोलणें	वि० १ जाप्य. २ जप्ता. भा० ३ जप.
१६० जर्ज्	दुखावणें	वि० १ जर्जर.
१६१ जल्	लपविणें	ना० १ जाल (जाळें).
१६२ जल्प	स्पष्ट बोलणें	भू० वि० १ जल्पित. वि० २ जल्पक. भा० ३ ज-

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		ल्यना.
१६३ जागृ	जागेहोणें	भू॰ वि॰ १ जागृत. वि॰ २ जागरूक. भा॰ ३ जागृति.
१६४ जि	जिंकणें	भू॰ वि॰ १ जित. २ विजित. ३ अजित. ४ पराजित. वि॰ ५ जयी. ६ विजयी. ७ जेता. ८ जय्य. ९ अजय्य. १० जेय. ११ अजेय. १२ जिगीषु. १३ जैत्र. १४ दुर्जय. १५ जिष्णु. ना॰ १६ जय. १७ विजय. १८ जिगीषा. १९ पराजय.
१६५ जीव्	वांचणें	भू॰ वि॰ १ जीवित. वि॰ २ संजीवनी. ३ अनुजीव्य. ४ निर्जीव. ५ उपजीव्य (यजमान). ६ उपजीवक (चाकर). ७ अनुजीवक. ८ सजीव. ९ उपजीवि. (चाकर). ना॰ १० जीव. भा॰ ११ जीवन. १२ उपजीविका. १३ अनुजीवन. १४ उज्जीवन (उठावणी).
१६६ जुड्	जोडणें	यापासून प्राकृत जोडणें.
१६७ जृंभ्	गात्रें ताणणें	भू॰ वि॰ १ उज्जृंभित (विकसित जाहालेलें). ना॰ २ जृंभा (जांभई).
१६८ जृ	ह्मातारें होणें (जर्, जीर्)	भू॰ वि॰ १ जीर्ण (जुनें). २ अजीर्ण. वि॰ ३ जरठ. ४ निर्जर. ना॰ ५ जरा (ह्मातारपण).
१६९ ज्ञा	जाणणें	भू॰ वि॰ १ ज्ञात. २ आज्ञप्त. ३ आज्ञापित. ४ अनुज्ञात. ५ प्रतिज्ञात. वि॰ ६ ज्ञानी.

धातु. अर्थ. उदाहरण.

७ ज्ञेय. ८ प्रज्ञावान्. ९ दुर्ज्ञेय. १० सुज्ञ. ११ अज्ञ. १२ ज्ञातव्य. १३ ज्ञापक. १४ ज्ञाप्य. १५ ज्ञाता. १६ प्राज्ञ. १७ विज्ञानी. १८ अभिज्ञ. भा० १९ प्रज्ञा. २० संज्ञा. २१ अनुज्ञा. २२ अवज्ञा. २३ आज्ञा. २४ प्रतिज्ञा. २५ आज्ञप्ति. २६ विज्ञप्ति. २७ विज्ञान. २८ परिज्ञान. २९ ज्ञान. ३० ज्ञापन (जाणविणें). ३१ आज्ञापन.

१७० ज्वर् रोगहोणें. भू० वि० १ ज्वरित. वि० २ ज्वरी. ना० ३ ज्वर.

१७१ ज्वल् पेटणें भू० वि० १ ज्वलित. २ प्रज्वलित. ३ उज्ज्वलित. ना० ४ ज्वाला. भा० ५ प्रज्वालन. ६ उज्ज्वलन. यापासून प्राकृत उजळ, उजळणें.

ट.

१७२ टक् बांधणें ना० १ टंक (टांकी).

१७३ टीक् जाणें, जाणणें } वि० १ सटीक. ना० २ टीका.

ण.

१७४ णम् बोलावणें (नम, नाम) } ना० १ नाम (नाव). २ नामधेय (तोच अर्थ).

१७५ णल् बांधणें ना० १ नल (नळ). २ प्रणाली. ३ प्रणालिका (तोच अर्थ).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
१७६ णास्	शब्दकरणें	ना० १ नासा (नाक). २ नासिका (तोच अर्थ).

त.

१७७ तट्	रचणें	वि० १ तटी. ना० २ तट. यापासून प्राकृत तारी.
१७८ तड्	ठोकणें	भू० वि० १ ताडित. २ संताडित. भा० ३ ताडन.
१७९ तंत्रि	पसरणें	ना० १ तंत्र (मंत्रशास्त्रांतील पूजाविशेष).
१८० तद्र	मोहितकरणें	ना० १ तंद्रा (आलस्य).
१८१ तन्	पसरणें	वि० १ उत्तान (उताणें). २ नितांत. ना० ३ तनु (शरीर). ४ तंतु.
१८२ तप्	तापणें	भू० वि० १ तप्त. २ संतप्त. ३ तापित. ४ अनुतप्त. वि० ५ अनुतापी. ६ तापस (तपस्वी). ना० ७ ताप. ८ संताप. ९ अनुताप. १० पश्चात्ताप. ११ तप. १२ आतप. १३ तपन (सूर्य). भा० १४ तापन (तापविणें).
१८३ तर्क्	कल्पनाकरणें	भू० वि० १ तर्कित. २ वितर्कित. वि० ३ तर्क्य. ४ अतर्क्य. ५ वितर्क्य. ६ अप्रतर्क्य. ना० ७ तर्क. ८ वितर्क. ९ कुतर्क.
१८४ तल्	खालीअसणें	ना० १ तल (तळ). २ तालु. ३ अतल. ४ वितल. ५ सुतल. ६ तलातल. ७ महातल. ८ रसातल. ९ पाताल.
१८५ तस्	अलंकारकरणें	ना० १ अवतंस (तुरा). २ उत्तंस (तोच अर्थ).

धातु.	अर्थ.	उदाहरण.
१८६ तिज्	पाजिवणें	भू० वि० १ तीक्ष्ण. वि० २ उत्तेजक. ३ सतेज. ४ निस्तेज. ना० ५ तेज. भा० ६ उत्तेजन.
१८७ तुर्	घाईकरणें	वि० १ आतुर. २ तुरंग (घोडा). ३ तुरंगम (तोचअर्थ).
१८८ तुल्	तोलणें	भू० वि० १ तुलित. वि० २ तुल्य. ३ अतुल. भा० ४ तुलना. ५ तोलन. ६ तुला.
१८९ तुष्	संतोषी होणें	भू० वि० १ तुष्ट. २ संतुष्ट. वि० ३ संतोषी. ४ तोषक. ना० ५ तुष्टि. ६ तोष. ७ संतोष. भा० ८ तोषण.
१९० तूण्	भरणें	ना० १ तूण (तीरठेवायाचा भाता). २ तूणीर. (तोचअर्थ). यापासून तुणणें.
१९१ तृप्	संतोषकरणें	भू० वि० १ तृप्त. २ अतृप्त. ३ अतितृप्त. ना० ४ तृप्ति. ५ अतितृप्ति. ६ अतृप्ति. ७ तर्पण. ८ संतर्पण.
१९२ तृष्	ताहानलागणें	भू० वि० १ तृषित. २ तर्षित. ना० ३ तृषा. ४ तृष्णा.
१९३ तॄ	तरणें (तर्, तार्, तीर्)	भू० वि० १ अवतीर्ण. २ उत्तीर्ण. ३ तीर्ण. वि० ४ तारक. ५ अनुत्तर. ६ दुस्तर. ७ उत्तार्य. ८ अवतारी. ना० ९ तारा. १० तरणि (सूर्य). ११ तरु. १२ तरंग. १३ निस्तार (तरणोपाय). १४ निस्तरण (तोचअर्थ). १५ उत्तर. भा० १६ तरण. १७ तारण.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		१८ अवतरण. १९ उत्तार. २० अवतार. या धातूपासून प्राकृत तर (मचवा) उतारू, तारू, तरंगणें इत्यादि.
१९४ त्रप्	लाजणें	ना० १ त्रपा (लाज).
१९५ त्रस्	भिणें	भू० वि० १ त्रस्त. २ संत्रस्त. ३ त्रासित. ४ वित्रस्त. वि० ५ त्रासक. ना० ६ त्रास.
१९६ त्रुट्	तुटणें	भू० वि० १ त्रुटित. भा० २ त्रोटन. यापासून तोडणें.
१९७ त्रै	पाळणें	भू० वि० १ त्रात (रक्षिलेला). वि० २ त्राता. भा० ३ त्राण. ४ परित्राण.
१९८ त्यज्	टाकणें	भू० वि० १ त्यक्त. वि० २ त्याज्य. ३ परित्यजनीय. ४ त्यागी. भा० ५ त्याग. ६ परित्याग.
१९९ त्वर्	घाईकरणें	भू० वि० १ त्वरित. वि० २ सत्वर. ना० ३ त्वरा.

द.

२०० दंड्	शासनकरणें	वि० १ उद्दंड. २ दंड्य. ३ दंडनीय. ना० ४ दंड. भा० ५ दंडन.
२०१ दंभ्	ठकविणें	वि० १ दांभिक. ना० २ दंभ (ढोंग).
२०२ दम्	शमविणें	भू० वि० १ दांत (शमविलेला). वि० २ उद्दाम. ३ दम्य. ४ दमी. भा० ५ दम. ६ दमन.
२०३ दय्	रक्षणकरणें	भू० वि० १ दयित (प्रिय). २ दयिता (प्रिया). वि० ३ दयालु. ४ सदय. ५ निर्दय. ना० ६ दया.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
२०४ दरिद्रा	गरीबहोणें	वि० १ दरिद्र (निर्धन). २ दरिद्री. ना० ३ दारिद्र्य.
२०५ दल्	फोडणें	भू० वि० १ दलित. २ विदलित. भा० ३ निर्दलन. ४ दलन. यापासून प्राकृत दळणें.
२०६ दश्	चावणें	भू० वि० १ दष्ट. २ दंशित. ना० ३ दंश. ४ उपदंश.
२०७ दह्	जाळणें	भू० वि० १ दग्ध. २ विदग्ध. (चतुर). ना० ३ दाह. ४ वैदग्ध्य. भा० ५ दहन.
२०८ दा	देणें	भू० वि० १ उदात्त. २ अनुदात्त. वि० ३ दाता. ४ देय. ५ अदेय. ६ उपादेय. ७ दापनीय. ८ दाप्य. ९ दापक. ना० १० दाय (वांटा). ११ निदान. १२ उपादान. भा० १३ दान. १४ कुदान. १५ अवदान. १६ दापन.
२०९ दास्	देणें	ना० १ दास. २ दासी. ३ दास्य.
२१० दिश्	दाखविणें	भू० वि० १ उपदिष्ट. २ आदिष्ट. ३ उद्दिष्ट. ४ निर्दिष्ट. वि० ५ उपदेष्टा. ६ उपदेशक. ७ ना० ८ दिशा. ९ देश. १० उपदेश. ११ उपदिशा. १२ अतिदेश. १३ आदेश. १४ उद्देश. १५ दिक्. १६ निदेश (आज्ञा). १७ संदेश (बातमी). १८ निर्देश.
२११ दिह्	एकत्र जमा करणें	वि० १ संदिहान. ना० २ देह. ३ संदेह.
२१२ दीक्ष्	व्रत घेणें	भू० वि० १ दीक्षित. ना० २ दीक्षा.

धातु. अर्थ. उद्राहरण.

२७३ दीप् प्रकाशणें भू० वि० १ दीप्त. २ प्रदीप्त. वि० ३ उद्दीपक. ४ देदीप्यमान. ना० ५ दीप. ६ प्रदीप. ७ दीप्ति. भा० ८ उद्दीपन.

२७४ दुःखू दुःखदेणें भू० वि० १ दुःखित. वि० २ निर्दुःख. ३ सदुःख. ४ दुःखी. ना० ५ दुःख.

२७५ दुल् डोलणें भू० वि० १ आंदोलित. वि० २ दोलायमान. ना० ३ आंदोला (झोपाळा). ४ दोला (तोच अर्थ). भा० ५ आंदोलन. यापासून प्राकृत हिंदुळा.

२७६ दुष् वाईट कामी करणें भू० वि० १ दुष्ट. २ दूषित. वि० ३ दोषी. ४ सदोष. ५ निर्दोष. ६ दूषक. ७ दूष्य. ना० ८ विदूषक (फजीतखोर). ९ दोष. १० दूषण.

२७७ दुह् भरणें वि० १ दोग्धा. ना० २ दुग्ध. भा० ३ दोहन.

२७८ दृ घेणें भू० वि० १ दृत. २ आदृत. ना० ३ आदर. ४ अनादर.

२७९ दृप् गर्विष्ठ होणें भू० वि० १ दृप्त. २ दर्पित. ना० ३ दर्प. ४ कंदर्प (कामदेव).

२८० दृश् पाहणें (दर्श्) भू० वि० १ दृष्ट. २ दर्शित. ३ प्रदर्शित. वि० ४ दर्शक. ५ दर्शी. ६ दृश्य. ७ अदृश्य. ८ दर्शनीय. ९ द्रष्टा. १० उपद्रष्टा (चौकसनीस). ११ दुर्दर्शी. १२ द्रष्टव्य. ना० १३ दृष्टि. १४ आदर्शी. १५ दृक्. १६ दर्शी. भा० १७ दर्शन. १८ प्रदर्शन.

धातु.	अर्थ.	उदाहरण.
२२१ दॄ	फाडणें	भू० वि० १ विदारित. वि० २ विदार्य. ना० ३ दारु. भा० ४ विदारण. ५ दारण.
२२२ द्युत्	प्रकाशणें	भू० वि० १ द्योतित. ना० २ द्युति. (प्रकाश). भा० ३ द्योतन.
२२३ द्रु	जाणें	ना० १ द्रव. २ द्रव्य.
२२४ द्रुह्	ठार माराव यास इच्छिणें	वि० १ द्रोही. २ द्रोहक. ना० ३ द्रोह.
२२५ द्रै	निजणें	भू० वि० १ उन्निद्र. २ निद्रित. वि० ३ निद्रालु. ना० ४ निद्रा.
२२६ द्विष्	द्वेषकरणें	भू० वि० १ द्विष्ट. २ विद्विष्ट. वि० ३ द्वेषी. ४ द्वेष्य. ५ द्वेष्टा. ६ विद्वेषी. ७ विद्वेष्टा. ना० ८ द्वेष. ९ विद्वेष.

ध.

२२७ धम्	फुंकणें	ना० १ धमनी. (फुंकणी किंवा रक्तवाहिनी शिरा). २ धमन (भाता)
२२८ धा	पोसणें (हि)	भू० वि० १ अभिहित. वि० २ उपधायक. ३ धाता. ४ विधाता. ५ प्रधान. ६ अप्रधान. ७ अभिधेय. ८ अभिधायक. ९ विधायक. १० विधेय. ना० ११ धातु. १२ समाधान. १३ उपाधान. १४ अभिधा. १५ अभिधान. १६ विधि. १७ धात्री (दाई). भा० १८ विधान. १९ विधापन.
२२९ धा	धारणकरणें (हि)	भू० वि० १ परिहित. (नेसलेलें). २ परिधा-

धातु.	अर्थ.	उदाहरण.
		पित (नेशिवलेले). वि० ३ परिधानीय. ४ परिधापयिता. ना० ५ अवधान. ६ अनुसंधान. ७ संधान. ८ संधि. भा० ९ परिधान. १० परिधापन.
२३० धाव्	धांवणे	भा० १ धावन (पळणे).
२३१ धाव्	स्वच्छ करणें	भू० वि० १ धावित. भा० २ धावन. ३ दंतधावन.
२३२ धूप्	तापविणें वासदेणें.	भू० वि० १ धूपित. ना० २ धूप.
